# 'मुखवटा'चे नाट्यरूपांतर 'मॅडम'
# एक आकलन



डॉ. सचिन रूपनर

Scanned by CamScanner

# 'मुखवटा'चे नाट्यरूपांतर 'मॅडम' : एक आकलन

डॉ. सचिन रुपनर

समीक्षा पब्लिकेशन

Scanned by CamScanner

प्रकाशन क्रमांक - १३०

'मुखवटा'चे नाट्यरूपांतर 'मॅडम' : एक आकलन
डॉ. सचिन रुपनर

© डॉ. सचिन रुपनर
५८/४०, नवीन कराड नाका, पंढरपूर, जि. सोलापूर
मो.७४९८५५५४२५

प्रकाशन - समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर.

प्रकाशक : श्री. प्रविण अनिलराव भाकरे,
शंकर - पार्वती निवास, ढोले गल्ली, रांझणी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३ ३०४
मो. ९६८९१४१२०१ / ८६०५५१२७४२
Email ID: samikshapublicatin1201@gmail.com

मुद्रण : एक्सेल प्रिंटर्स, पुणे

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

प्रथमावृत्ती : २३ मे २०२१

अक्षरजुळणी : समीक्षा टाईपसेटर्स, पंढरपूर.

ISBN : ९७८-९३-९०४२४-८३-२

मूल्य : १३० रु.

Scanned by CamScanner

मराठी वाङ्मयपरंपरेचे पूर्वावलोकन केले असता एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे, कादंबरी हा लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. माणसाच्या भावभावना, राग-लोभ, विचार-विकार, कौटुंबिक-सामाजिक जीवनजाणिवा, मानवी मनाची घुसमट, सरळमार्गी जीवन जगत असताना वाट्याला येणारे दुःख, अनपेक्षित घडून येणाऱ्या घटना आणि त्यातून बदलणारे अंतर्बाह्य जगण्याचे संदर्भ, वाट्याला आलेल्या जगण्यातून पूर्णांशाने बदलणारा माणूस या आणि यासारख्या कितीतरी गोष्टींचे संचित साकल्याने कादंबरीतून पाहायला मिळते.

हेच संचित आणि जीवनानुभवाचा ठेवा प्रेक्षकाभिमुख करण्याच्या भूमिकेतून अनेक कादंबऱ्यांची नाट्यरुपांतरे झालेली आहेत. कधी ती इतर लेखकांनी केली आहेत तर कधी स्वतः लेखकांनी केली आहेत. याच परंपरेत प्रा. टी. के. जाधव यांच्या 'मुखवटा' या कादंबरीचे श्रीनिवास भणगे यांनी 'मॅडम' या नावाने नाट्यरूपांतर केले.. या नाटकाने महाराष्ट्राची रंगभूमी गाजविली. अनेक प्रथितयश रंगकर्मींनी त्यासाठी बहुमोल असे योगदान दिले त्याचे आपण साक्षीदार आहोत.

डॉ. सचिन रुपनर यांनी त्यावर प्रकाश टाकण्यासाठी संशोधन केले. तेच संशोधन 'मुखवटाचे' नाट्यरूपांतर 'मॅडम' : एक आकलन या नावाने पुस्तकरूपाने येत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे.

या पुस्तकाच्या रूपाने मराठी कादंबरी व नाटकाची पूर्वपीठिका, कादंबरी लेखकाचा परिचय, 'मुखवटा' कादंबरीची आशय वैशिष्ट्ये, पात्रचित्रण, शब्दकळा याचा परिचय होण्यास मदत होते. याबरोबरच कादंबरीच्या आशयविश्वाला रंगभूमीच्या पटलावर सादर करताना कराव्या लागणाऱ्या कधी अपरिहार्य तर कधी रंगभूमीची गरज म्हणून अधिक लक्षवेधी करण्यासाठी करावे लागलेले बदल याचा लेखाजोखा डॉ. सचिन रुपनर यांनी संशोधनाची शिस्त पाळून समर्थपणे शब्दांकित केला आहे.

हा ठेवा मराठी रसिक वाचक, अभ्यासक, संशोधक यांना निश्चितच दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास वाटतो.

**डॉ. चंद्रशेखर कणसे**
नाट्यशास्त्र विभागप्रमुख, एस.पी.पी. महाविद्यालय,
सिरसाळा, ता.परळी वैजनाथ, जि. बीड

समीक्षा पब्लिकेशन

मूल्य : १३०/-

ISBN : 978-93-90424-83-2

Scanned by CamScanner